ePaper
वर्ष - 7 । अंक -20 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | मंगळवार, दि. 16 मे 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## मुंबईत काँग्रेसची स्वबळाची तयारी!, नाना पटोले यांचे संकेत



**आतील पानांत**
- पिंपरी-चिंचवडच्या पाण्यावर फडणवीसांनी काढला तोडगा!
- खासदार कोल्हेंना धमकी देणाऱ्या पोलिसाला आयुक्तांनी पाठवले घरी

# निवडणुका ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये?

## महापालिका निवडणुकांबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे संकेत

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील महापालिका निवडणुकांच्या पहिल्या लढाईत भाजप-शिवसेनेचा भगवा झेंडा पुणे महापालिकेवर फडकेल, असा विश्वास व्यक्त करत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऑक्टोबर-नोव्हेंबरच्या सुमारास महापालिका निवडणूक होण्याचे संकेतही दिले.**

भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्ता मेळाव्यात फडणवीस बोलत होते. पालकमंत्री चंद्रकांत पाटील, शहराध्यक्ष जगदीश मुळीक, माजी आमदार मेधा कुलकर्णी, दिलीप कांबळे, राजेश पांडे आदी या वेळी उपस्थित होते. याच कार्यक्रमात जगदीश मुळीक शहराध्यक्षपदाचा संघर्षपर्व या कार्यअहवाल प्रकाशित करण्यात आला.महावसुली सरकार, स्थगिती सरकार घालवून आता राज्यात गतिशील सरकार आहे. कोट्यवधीच्या योजना पुन्हा पुण्यात सुरू झाल्या आहेत. मिळकत कराचा ४० टक्क्यांचा प्रश्न सोडवला. पुणे भाजपचा गड आहे. गिरीश बापट, मुक्ता टिळक यांची पोकळी जाणवेल. पण गिरीश बापट यांनी संघर्ष करून कार्यकर्त्यांची फळी उभी केली. आजचा संघर्ष वेगळा आहे. संघटन ही भाजपची ताकद आहे. कार्यकर्त्यांनी प्रत्येक घरापर्यंत पोहोचण्याची गरज आहे.



आता पहिली लढाई महापालिकेची येईल. ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये किंवा न्यायालय सांगेल तेव्हा येईल. पहिली लढाई भाजप-शिवसेना जिंकणार, पुणे महापालिकेवर भगवा फडकणार, असे त्यांनी सांगितले. कर्नाटकात भाजपचे ०.४ टक्के इतकेच कमी मतदान झाले आणि चाळीस जागा कमी झाल्या. पण लोकसभा निवडणुकीत कर्नाटकातील २८ पैकी किमान २५ जागा भाजप जिंकेल, हा माझा दावा आहे, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. जगातील अनेक देशांत मंदी असली तरी भारतात मंदी नाही. जगात सर्वाधिक वेगाने भारताची अर्थव्यवस्था विकसित होत असल्याचे फडणवीस म्हणाले.

### यंदाचे वर्ष निवडणुकांचे:चंद्रकांत पाटील

**पुण्याचे पालकमंत्री आणि उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सोमवारी भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्ता मेळाव्यात संवाद साधला. त्यावेळी त्यांनी आगामी महापालिका, लोकसभा, विधानसभा निवडणुकांचे थेट वेळापत्रकच सांगितले. तसेच कार्यकर्त्यांना त्यानुसार काम करण्याच्या सूचनाही दिल्या. कार्यकर्ता मेळाव्याला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे शहराध्यक्ष जगदीश मुळीक आदी या वेळी उपस्थित होते. या वेळी कार्यकर्त्यांशी संवाद साधताना चंद्रकांत पाटील म्हणाले, की यंदाचे वर्ष हे निवडणुकांचे आहे. मी काही भविष्यवाला नाही. पण सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर रांगेने महापालिका, नगरपालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषद निवडणुका होतील. न्यायालयाने काही नवीन रचना मांडल्यास त्यानुसार कामकाज करून नोव्हेंबर, डिसेंबरमध्ये निवडणुका होतील. त्यानंतर ज्या निवडणुका चुकतच नाहीत, अशा लोकसभा निवडणुका मार्चमध्ये घोषित होऊन सहा टप्प्यात होतील. ती प्रक्रिया मे अखेरपर्यंत चालेल. त्यानंतर चुकतच नाही अशी विधानसभा निवडणूक ऑक्टोबरमध्ये होईल.त्यामुळे महापालिका, लोकसभा आणि विधानसभा निवडणूका मिळून यंदाचे वर्षे निवडणुकीचे वर्ष आहे. या निवडणुकांमध्ये चांगल्या संख्येने विजयी व्हायचे असल्यास सर्वांविषयी परिश्रम घेण्याची आवश्यकता आहे. काम करूनही भारतीय जनता पक्षाविषयी काही गैरसमज आहेत. हे गैरसमज भाषण देऊन दूर होणार नाहीत. त्यासाठी वैयक्तिक संवाद साधावा लागेल, असेही पाटील यांनी सांगितले.**

# पिंपरी - चिंचवडमध्ये 'युती' पॅटर्नची चर्चा!

## अजित दादांच्या हस्ते भूमिपूजन; फडणवीसांकडून उदघाटन, बॅनरची जोरदार चर्चा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे शहरातील विविध विकास कामांच्या उद्घाटन आणि लोकार्पण सोहळ्यासाठी पिंपरी चिंचवड दौऱ्यावर आले होते. यावेळी पिंपरी चिंचवड येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहाचे लोकार्पण देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. उदघाटन जरी फडणवीसांच्या हस्ते झाले असले तरी, हे नाट्यगृह एका वेगळ्या बॅनरमुळे चर्चेत आले आहे. या बॅनरवर अजित दादांच्या हस्ते भूमिपूजन आणि देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण असा मजकूर आहे. त्यामुळे या बॅनरची जोरदार चर्चा होऊ लागली आहे.**

११ जुलै २०१४ साली अजित पवार यांनी या नाट्यगृहाचे भूमिपूजन केले होते. तेव्हापासून नाट्यगृहाचे काम सुरू होते. मात्र, आता तब्बल १० वर्षांच्या कालावधीनंतर या नाट्यगृहाचे लोकार्पण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. त्यामुळे अजित दादांनी केलेला वादा फडणवीसांनी पूर्ण केला अशा आशयाचे बॅनर या परिसरात झळकले आहेत.

अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस हे जरी राजकीय विरोधक असले तरी त्यांची मैत्री राजकारणात पलीकडची असल्याचे आपण अनेकदा पाहिले आहे.

या बॅनर मधून पुन्हा एकदा या दोन्ही नेत्यांतील जवळीकीची चर्चा सुरू झाली आहे. या बॅनरवर अजित दादांच्या हस्ते भूमिपूजन आणि देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण असा मजकूर आहे.



# पिंपरी-चिंचवडच्या पाण्यावर फडणवीसांनी काढला तोडगा!

## ग्रामीण पाणी (सिंचनाच्या) भांडणावर उतारा सांगितला

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री हे सोमवारी (ता.१५) पिंपरी-चिंचवड दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या विविध विकासकामांची उदघाटने, भुमीपूजने केली. यावेळी त्यांनी शहरी पिण्याच्या आणि ग्रामीण पाणी (सिंचनाच्या) भांडणावर उतारा सांगितला.**

महापालिकांनी सांडपाण्यावर प्रक्रिया केलेले पाणी हे उद्योग तथा एमआयडीसींना देणार असून त्यांना देण्यात येणारे सिंचनाचे पाणी थांबविणार आहे.त्यामुळे शहरी आणि ग्रामीण भागातील पाणी भांडण मिटेल,असे फडणवीस यावेळी म्हणाले.सध्या पिंपरी-चिंचवडला दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. म्हणून खेड तालुक्यातील भामा आसखेड धरणातून २६ किलोमीटर जलवाहिनी टाकून १६७ एमएलडी पाणी पिंपरीत आणले जाणार आहे. त्यासाठी जमिन अधिग्रहण हा कळीचा मुद्दा आहे.

ती एका महिन्यात अधिग्रहीत करून पिंपरी महापालिकेच्या ताब्यात देण्याचा आदेश त्यांनी यावेळी व्यासपीठावरील पुणे विभागीय आयुक्त सौरभ राव आणि



पुणे जिल्हाधिकारी राजेश देशमुख यांना दिला.साडेबारा टक्क्यासह शहराचे इतर प्रलंबित प्रश्न सरकार वेगाने मार्गी लावणार असल्याचे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले. पिंपरी-चिंचवडला सेफ सिटी करण्याकरिता शहर पोलिस दलाचे बळकटीकरण करू, असे ते म्हणाले. दोन तास उशीरा सुरु झालेला हा सोहळा आज उदघाटन झालेल्या ग.दि.माडगूळकर नाट्यगृहात झाला.

हा धागा पकडीत `गदिमा `यांचे नाव नाट्यगृहाला दिल्याने पिंपरी-चिंचवडची उंची वाढली,असे गौरवौद्गार फडणवीसांनी काढले. आधुनिक वाल्मिकी असलेले गदिमा हे साहित्य जत्रेतील अविस्मरणीय स्वप्न आहे, असे ते म्हणाले.पिंपरी-चिंचवड हे शहर आहे आणि गावही आहे.त्याच्याकडून भविष्याला आणि भविष्यात अपेक्षा आहेत,या शब्दांत त्यांनी शहराचे कौतूक केले.यावेळी त्यांनी यावर्षी ३ जानेवारीला निधन झालेले शहरातील चिंचवडचे भाजपचे आमदार लक्ष्मण जगताप यांची आवर्जून आठवण काढली.

---

# खासदार कोल्हेंना धमकी देणाऱ्या पोलिसाला आयुक्तांनी पाठवले घरी

## शिवपुत्र संभाजी महानाट्याचा पास फुकट मागणे भोवले

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अभिनेते आणि राष्ट्रवादीचे शिरूरचे खासदार अमोल कोल्हे यांच्या शिवपूत्र संभाजी या महानाट्याचे प्रयोग सध्या पिंपरी-चिंचवडमध्ये सुरु आहेत. त्याला गालबोट लावणारी घटना घडली. या महानाट्याचे मोफत पास दिले नाहीत म्हणून एका पोलिसाने थेट कोल्हेंनाच धमकावले होते.**

या गंभीर प्रकाराची पिंपरी-चिंचवडचे पोलीस आय़ुक्त विनयकुमार चौबे यांनी तातडीने दखल घेत या पोलिसाला निलंबित केले आहे. महेश नाळे असे त्याचे नाव असून तो पिंपरी पोलीस ठाण्यात पोलीस नाईक आहे. त्याच्यावर कारवाई करण्याची मागणी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि सुप्रिया सुळे यांनी या घटनेनंतर केली होती.

राज्याचे गृहमंत्री आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी योग्य दखल घेऊन संबंधित पोलीसाला समज द्यावी, असे खासदार कोल्हेंनी म्हटले होते. त्यामुळे सबंधित पोलिसांवर गृहमंत्र्यांअगोदरच पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे हेच कारवाई करण्याची शक्यता आहे, असे वृत्त 'सरकारनामा'ने कालच (ता.१४) दिले होते. ते लगेच खरे ठरले. पोलीस आयुक्तांनी काल नाळेला निलंबित केले. कारण फडणवीस हे आज पिंपरी महापालिकेच्या विविध विकासकामांचे उद्घाटन आणि भूमिपूजनासाठी आज शहरात येणार होते. या महानाट्याच्या




### छत्रपतींचा इतिहास पाहण्यासाठी भीक मागता

या महानाट्याच्या याआगोदर झालेल्या प्रयोगाला पोलीस तिकीट काढून आल्याची आठवण त्यांनी यावेळी सांगितली होती. त्यांच्या सहकार्यांचाही उल्लेख केला होता. नागरिक जो कर भरतात त्यातून पोलिसांचा पगार होतो. असे असताना छत्रपतींचा इतिहास पाहण्यासाठी भीक मागता हे पोलिसांच्या उज्वल परंपरेला गालबोट लावणारे आहे, अशी खंत त्यांनी व्यक्त केली होती.

प्रयोगाचे मोफत पास दिले नाही म्हणून हा प्रयोग कसा होतो तेच पाहतो अशी धमकी नाळेने खासदार कोल्हेंना दिली होती.


---

# निव्वळ अपमान झाल्याचा बदला म्हणून मावळातील खुनाच्या घटना

।मावळ। महाईन्यूज । प्रतिनिधी।

मावळ तालुक्यात गेल्या दीड महिन्यात दोन जणांचा निर्घूण खून करण्यात आला. प्रति शिर्डी शिरगावचे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सरपंच प्रवीण गोपाळे यांच्या खुनाची घटना ताजी असतानाच तळेगाव दाभाडे नगर परिषदेतील माजी सत्ताधारी जनसेवा विकास समितीचे संस्थापक अध्यक्ष किशोर आवारे यांचा शुक्रवारी (दि.१२) भरदिवसा तळेगावात निर्घूण खून झाला. या खुनाच्या घटनांनी मावळ तालुका हादरला आहे. पण या दोन्ही खुनांमध्ये एक महत्वाचं साम्य समोर आलं आहे.

किशोर आवारे यांचा भरदिवसा तळेगावात निर्घूणपणे खून करण्यात आला होता. यामुळे मावळ तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे. आवारेंच्या हत्येत आरोप,प्रत्यारोपही झाले.तसेच या खूनाच्या गुन्ह्यात



राष्ट्रवादी कॉंग्रेसचे स्थानिक आमदार सुनील शेळके यांना आरोपी करण्यात आल्यानं हे प्रकरण चांगलंच तापलं. पण आता मावळ तालुक्यातील खुनाच्या घटना निव्वळ अपमान झाल्याचा बदला म्हणून झाल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आलं आहे. गोपाळे आणि आवारेंचे खून हे अपमानातून झाल्याची माहिती देणारे पोलीस अधिकारी हे एकच म्हणजे एसीपी पद्माकर घनवट आहेत हा पहिला योगायोग आहे. तर, हे दोन्ही खून जमीन खरेदी विक्रीच्या व्यवहारातून झाल्याचा संशय प्रथम व्यक्त करण्यात आला होता. तो नंतर तपासात खोटा ठरला, हा दुसरा योगायोग ठरला. दोन्ही खून मारेकऱ्यांनी पाळत ठेवून केले.

# पुणे जिल्ह्याचं विभाजन होणार?

## भाजप आमदार महेश लांडगे यांची उपमुख्यमंत्री फडणवीसांकडे मोठी मागणी

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड शहर जसं वाढत आहे तसा पुणे जिल्ह्याचा देखील विस्तार होत आहे. मात्र, तहसील कार्यालय पिंपरी चिंचवडमध्ये असूनही काही गावांना प्रशासकीय काम करून घेण्यासाठी इथपर्यंत यावे लागते, त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो आहे. त्यामुळे पुणे जिल्ह्याचे विभाजन करून पिंपरी चिंचवड शहरालगत असणाऱ्या भागाला शिवनेरी जिल्हा म्हणून नाव देऊन पुणे जिल्ह्याचे विभाजन करावं ,अशी मागणी भोसरीचे आमदार महेश लांडगे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.**



शहरात पार पडलेल्या विकासकामांच्या उदघाटनादरम्यान आमदार महेश लांडगे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडे पुणे जिल्ह्याची विभाजनाची मागणी केल्याने खळबळ उडाली आहे. खरंच पुण्याचं विभाजन होणार की लांडगेची इच्छा अपुरीच राहणार अशी जोरदार चर्चा सध्या पुणे जिल्ह्यात चालू आहेत.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आज पिंपरी-चिंचवड दौऱ्यावर होते. पिंपरी चिंचवड येथे विविध विकास कामांचे उद्‌घाटन आणि लोकार्पण त्यांनी यावेळी केले. त्यावेळी भाषणादरम्यान आमदार महेश लांडगे यांनी ही मागणी केली आहे. आकुर्डीत असलेल्या ग.दि.मा नाट्यगृहाचे देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी आणखी विकासकामांचे ऑनलाईन पद्धतीने उद्‌घाटन करण्यात आले.

यावेळी बोलताना महेश लांडगे म्हणाले की, देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे शहराला पोलिस आयुक्तालय मिळाले आहे. तसेच पिंपरी चिंचवडकरांच्या वतीने आणखी एक मागणी मी करत आहे की, पुणे जिल्ह्याचं विभाजन करून पिंपरी-चिंचवड शहराच्या बाजूच्या परिसराला शिवनेरी जिल्हा म्हणून नाव द्यावे. राजकीय विभाजन नाही, केवळ जिल्ह्याचे विभाजन करा, असेही लांडगे यांनी स्पष्ट केले आहे.

यावेळी पालकमंत्री चंद्रकात दादा पाटील, पिंपरीचे आमदार अण्णा बनसोडे, मावळचे खा.श्रीरंग बारणे याबरोबरच माडगूळकर कुटुंबीय आणि प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

### देवेंद्र फडणवीस म्हणाले...

चिंचवड शहर आणि लगतच्या भागाचं शिवनेरी जिल्हा म्हणून नवीन जिल्ह्याची निर्मिती करावी, अशी मागणी भाजप आमदार महेश लांडगे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. यामुळे पुणे जिल्ह्याचं विभाजन होणार का? याबाबत चर्चा सुरू झाली होती. दरम्यान याबाबत आता खुद्द फडणवीसांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. "जिल्हा विभाजनाच्या अनेक मागण्या आमच्याकडे आहेत. त्यामुळे एखाद्या जिल्ह्याचा विचार याठिकाणी करता येणार नाही. सर्वांचा विचार एकत्रितपणे करावा लागेल. एखादी मागणी करणे, त्यांचा अधिकार आहे. नगर जिल्ह्याचा तीन वेगवेगळ्या मागण्या आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या काही मागण्या आहेत. अशा अनेक जिल्ह्यांच्या विभाजनाच्या मागण्या आहेत, मात्र आता त्यावर बोलता येणार नाही," असे फडणवीस म्हणाले. मागील अनेक काळापासून महानगर पालिकेच्या निवडणुका रखडलेल्या आहेत. आता या निवडणुकांबाबत देवेंद्र फडणवीस यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. महानगरपालिकेच्या निवडणुकांसंदर्भात त्यांनी आता शक्यता वर्तवली आहे. महानगरपालिकेच्या निवडणुका या ऑक्टोबर नोव्हेंबर मध्ये होऊ शकतात, असं मोठं विधान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे.

### उद्धव ठाकरेंवर टीका

"जनतेच्या आशीर्वादाने महाराष्ट्रात पुन्हाआपलं सरकार आलं. खरं म्हणजे 2019 ला जनतेने आम्हाला निवडून दिलं होतं. त्यावेळी आपण युतीमध्ये लढलो. जनतेने युतीला 170 जागा दिल्या. मात्र, उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेने खुर्चीसाठी विचार सोडला. त्यांना खुर्चीचा एवढा मोह झाला होता की, विचार सोडून ते काँग्रेस आणि राष्ट्रवादीबरोबर जाऊन मुख्यमंत्रीपदाच्या लालसेपोटी जाण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे महाराष्ट्रात अभद्र असं महावसूली सरकार आलं ", अशी टीकाही देवेंद्र फडणवीसांनी केली केलं.

### "मुंबईचा समुद्र पिंपरी-चिंचवडला द्या...



राज्याचे मंत्री व पुण्याचे पालकमंत्री आज पिंपरी चिंचवड शहरात होते. आमदार महेश लांडगे यांच्या एका कार्यक्रमात ते सहभागी झाले होते. शहराचं विकास आणि व्यवस्थापन या विषयावर त्यांनी भाष्य करत, पिंपरी चिंचवडकरांना आवाहन ही केले. दरम्यान आमदार महेश लांडगे यांनी शहराच्या विकासाबाबत काही मागण्या केल्या होत्या,तसेच पुणे जिल्हा विभाजन व्हावे, अशी मागणी लांडगे यांनी केली होती. चंद्रकांत पाटील म्हणाले, "मला महेश लांडगे यांचं भाषण ऐकताना वाटलं, ते वेगवेगळ्या मागणी करताना मुंबईचा समुद्रही पिंपरीला द्या, अशी मागणी करतात की काय? परंतु लोकप्रतिनिधी तोच जे समाधानी असतो. लोकप्रतिनिधी जेव्हा समाधानी होतो, तेव्हा विकास संपतो. पिंपरी चिंचवडचा वाढणार विस्तार पाहता, कुठलीही गोष्ट पूर्ण होणारी नाही. मी पालकमंत्री म्हणून सर्वांना शब्द देतो की, जे जे विषय येतील, ते पूर्ण करूच." "परवाच काही प्रकल्पग्रस्तांनी शहराचं पाणी थांबवलं होतं, त्याबाबतीत त्यांना मी आश्वस्त केलं. वाढत्या शहरामध्ये जशी सरकारची विकासाची जबाबदारी आहे. पाणी, कचऱ्याचं व्यवस्थापन, रस्ते, सुरक्षा याबाबत प्रशासनाची जशी जबाबदारी आहे,तशी ती नागरिकांची ही जबाबदारी आहे," असेही चंद्रकांत पाटील म्हणाले.

# फडणवीसांच्या दौऱ्यापूर्वीच छावा मराठा महासंघ पदाधिकाऱ्यांची धरपकड

## सरकारी कामात अडथळा आणल्याचा गुन्हा नोंदवून गणेश भांडवलकर यांना अटक

।पिंपरी । महाईन्यूज ।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या विविध विकासकामांची उद्घाटने, भुमीपूजने करण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री हे सोमवारी (ता.१५) आले होते. यावेळी त्यांना काळे झेंडे दाखविणाऱ्या छावा संघटनेचे पिंपरी-चिंचवड शहर उपाध्यक्ष गणेश भांडवलकर यांना पोलिसांनी पकडले.**

सरकारी कामात अडथळा आणल्याचा गुन्हा नोंदवून निगडी पोलिसांनी भांडवलकर याला अटक केली आहे, अशी माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक रंगनाथ उंडे यांनी दिली. फडणवीस यांच्या निगडीतील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात कार्यक्रम होता. तिकडे जाताना त्यांच्या ताफ्याला भांडवलकरने काळे झेंडे दाखवले. म्हणून स्थानिक पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. नंतर गुन्हा दाखल करून अटक केली.



दरम्यान, आरक्षणासह मराठा समाजाच्या अन्य मागण्यांवर १४ मे पर्यंत सकारात्मक निर्णय घेतला नाही, तर राज्यातील मंत्र्यांना महाराष्ट्रात फिरू न देण्याचा इशारा मराठा आरक्षण समन्वय समितीने पिंपरी-चिंचवडमध्ये (आकुर्डी) घेतलेल्या एल्गार परिषदेत ६ मे रोजी दिला होता. आंदोल करू, असेही त्यांनी सांगितले होते. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून आणि उपमुख्यमंत्र्याचा दौरा सुरळीत पार पडण्यासाठी पोलिसांनी छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना सकाळीच स्थानबद्ध केले.

हा दौरा सुरु होण्यापूर्वीच ते सकाळी त्यांच्या घरी गेले आणि त्यांना ठाण्यावर घेऊन आले. त्यात छावा मराठा युवा महासंघाचे संस्थापक अध्यक्ष धनाजी येळकर-पाटील, संभाजी ब्रिगेडचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष सतीश काळे यांचा समावेश आहे.

रात्री नऊ वाजेपर्यंत त्यांना सोडण्यात आले नव्हते. फडणवीसांचा पुणे (PUNE) दौरा संपल्यानंतर त्यांना सोडले जाण्याची शक्यता आहे. मात्र, भांडवलकरविरुद्ध गुन्हा दाखल झाल्याने त्याला उद्या न्यायालयात हजर केले जाणार आहे.

# कर्नाटक निवडणूकीतून महत्त्वपूर्ण संदेश




सत्तेवरील पक्षाला सलग दुसऱ्यांदा संधी न देण्याची आपली चार दशकांची परंपरा कर्नाटकातील मतदारांनी यंदाही पाळली, असे म्हणून तेथील विधानसभा निवडणुकीच्या निकालांना संकुचित करता येणार नाही. दक्षिणेकडील या एकमेव राज्यात पाय रोवून उभ्या असलेल्या भारतीय जनता पक्षाला तेथील मतदारांनी नि:संदिग्धपणे नाकारले असून, आपल्या दररोजचे जगणे सुसह्य होईल या आशेने त्यांनी काँग्रेसच्या पदरात भरभरून माप टाकले आहे. भाजपच्या या दारुण पराभवात आणि काँग्रेसच्या दणदणीत विजयात अनेक संदेश आहेत.

धार्मिक ध्रुवीकरणाचे आणि द्वेषाचे राजकारण सतत यशस्वी होऊ शकत नाही, हा पहिला आणि सर्वांत मोठा संदेश. निवडणुकीच्या आधीपासूनच भाजपने 'हिजाब'वरून रण माजवले होते, निवडणुकीच्या तोंडावर मुस्लिमांचे आरक्षण काढले होते आणि ऐन प्रचारात बजरंग दलाच्या मुद्द्यावरून हिंदू-मुस्लिम फूट पाडण्याचा प्रयत्न केला होता. यांपैकी कोणताही मुद्दा मतदारांनी उचलून धरला नसल्याचे निकालावरून स्पष्ट होते. लिंगायत, वक्कलिग आदी प्रमुख जातींना आकर्षित केले, की त्यांचे एकगठ्ठा मतदान होते या भ्रमाचा भोपळाही मतदारांनी फोडला. लिंगायत मुख्यमंत्री देणार असे सांगून भाजपने या समाजाची मतपेढी टिकविण्याचा जोमाने प्रयत्न केला; परंतु पक्षाच्या ६९ लिंगायत उमदेवारांपैकी केवळ पंधरा विजयी झाले. काँग्रेसने ४६ लिंगायत उमेदवार उतरविले होते; त्यांपैकी ३७ विजयी झाले. लिंगायत समाज काँग्रेसकडे वळत असल्याचे हे सूचन म्हणता येईल. वक्कलिगांवर आपला हक्क असल्याच्या आविर्भावात असलेल्या धर्मनिरपेक्ष जनता दलालाही (जेडीएस) काँग्रेसने दणका दिला आहे. जुन्या म्हैसूर टापूतील ६१ वक्कलिग बहुल मतदारसंघांत काँग्रेसचे ३० उमेदवार विजयी झाले.

कर्नाटकात बी. एस. येडियुरप्पा हे भाजपचे सर्वांत मोठे नेते खरे; परंतु नेतृत्वाची दुसरी तगडी फळी भाजपला विकसित करता आली नाही. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या करिष्म्यावरच भाजप अवलंबून राहिला. प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यात बेंगळुरूमधील



त्यांच्या 'रोड शो'ने हवा केली. या महानगरात गेल्या वेळेपक्षा जास्त जागा भाजपला जिंकता आल्या असल्या, तरी एकुणात मोदींचा विकासाच्या 'डबल इंजिन'चा दावा मतदारांनी नाकारला. कर्नाटकातील भाजप सरकारवर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप होते, मुख्यमंत्र्यांवर चाळीस टक्के कमिशनचा आरोप होता. भाजपची ही प्रतिमा मोदींच्या 'ना खाऊंगा, ना खाने दूँगा' या घोषणेला छेद देणारी होती. या कारणानेही तेथील मतदारांनी भाजपकडे पाठ फिरविली. भाजपच्या तुलनेत काँग्रेसचा प्रचार त्यांना आश्वासक वाटला. काँग्रेसच्या पाच हमी योजनांची भुरळ पडणे स्वाभाविक. दरमहा दहा किलो मोफत तांदूळ, दोनशे युनिटपर्यंत मोफत वीज, महिलांना दरमहा दोन हजार रुपये, महिलांना मोफत एसटी प्रवास आणि बेरोजगारांना भत्ते या आश्वासनांमुळे सर्व समाजघटकांतील मतदार काँग्रेसच्या मागे उभे राहिले असावेत. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या 'भारत जोडो' यात्रेला कर्नाटकात मोठा प्रतिसाद मिळाला होता. या यात्रेच्या मार्गावरील ५१पैकी ३७ जागांवर काँग्रेसला विजय मिळाला. अवमान याचिकेद्वारे राहुल गांधींवर झालेल्या कारवाईकडे सूड म्हणून पाहिले गेले. त्याचाही परिणाम निवडणुकीच्या निकालातून दिसला.

कर्नाटकातील काँग्रेसच्या यशाचे श्रेय नि:संशयपणे डी. के. शिवकुमार, सिद्धरामय्या आणि काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांना द्यावे लागेल. शिवकुमार आणि सिद्धरामय्या यांनी राज्य पिंजून काढले आणि मुख्य म्हणजे आपसांतील वाद त्यांनी बाजूला ठेवले. भाजपच्या विरोधातील असंतोष त्यांनी नेमका हेरला. भाजपमधील नाराज नेत्यांना काँग्रेसमध्ये घेतले आणि उमेदवारीही दिली. काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वानेही स्थानिक नेत्यांना अवकाश दिला. या साऱ्या रणनीतीमुळे, साडेतीन दशकांनंतर काँग्रेसला मोठा विजय मिळविता आला. भाजपला पराभवात समाधानाची बाब एकच असेल, ती म्हणजे पक्षाच्या मतांची टक्केवारी कायम राहिली. काँग्रेसला पाच टक्के मते अधिक मिळाली आणि तेवढ्याच प्रमाणात 'जेडीएस'ची मते घटली. कर्नाटकमध्ये तिसरा कोन असलेल्या 'जेडीएस'चा संकोच होत असून, मध्य प्रदेश, गुजरात आदी राज्यांप्रमाणे तिथे भविष्यात काँग्रेस विरुद्ध भाजप असाच सामना होईल, असे दिसते. काँग्रेसच्या या मोठ्या विजयामुळे राष्ट्रीय राजकारणात पक्षाचे आणि राहुल गांधींचे वजन नक्कीच वाढेल. भाजपच्या ध्रुवीकरणाच्या सापळ्यात न अडकता सर्वसामान्यांचे मुद्दे घेऊन निवडणुकीच्या रणांगणात उतरण्याचे धोरण यशस्वी ठरते, हाही धडा कर्नाटकने दिला आहे.

## संपादकीय »

### 'बजरंगा'चा प्रकोप!

***सर्व निवडणुकांसाठी एकच एक चेहरा असणे ही भाजपची अडचण असू शकेल. ती मतदारांनी गोड मानून घेण्याचे कारण नाही. कर्नाटकी मतदारांनी हा विवेक दाखवला.***

साक्षात पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या २० हून अधिक सभा वा मेळावे, पुष्पवर्षाव करवून घेणाऱ्या थेट प्रक्षेपित मिरवणुका, प्रचारात भाजपचे पाच मुख्यमंत्री, १६ केंद्रीय मंत्री, या सगळ्यांच्या मिळून हजारो मिरवणुका, तीन हजारांहून अधिक प्रचारसभा, त्याहूनही अधिक लहान कोपरा/गल्ली सभा, त्याआधी राजकारणाच्या धार्मिक ध्रुवीकरणाचा उठलेला 'हिजाब', त्यात भरीला 'हलाल' मांस, तोंडी लावायला समान नागरी कायदा, लव्ह जिहाद आणि फडफडीत 'केरला स्टोरी', सावरकर यात्रा, हे कमी म्हणून की प्रचाराचा कालावधी संपल्यानंतरही मतदारांशी संवाद साधणारे पंतप्रधान आणि दिमतीस या सगळ्याकडे काणाडोळा करणाऱ्या निवडणूक आयोगासारख्या केंद्रीय यंत्रणा! हा सर्व तपशील सुरुवातीलाच नमूद केला कारण त्यामुळे भाजपच्या पराभवाची खोली आणि व्याप्ती लक्षात यावी. संपूर्ण देशाचे लक्ष लागलेल्या कर्नाटक विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा विजय आणि म्हणून भाजपचा पराभव अपेक्षितच होता.

**आम्ही नैतिकतेने राजकारण करतो, असा दावा खरे तर महाराष्ट्रातील कोणताही प्रमुख पक्ष करू शकत नाही. संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतर क्रमाक्रमाने 'नैतिक राजकारणा'ची दंतकथा होत गेली आहे. तेव्हा, गुरुवारी सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने दिलेला निकाल हा कुणाच्या नैतिकतेची उंची किंवा खोली मोजणारा नसून, महाराष्ट्राच्या सत्तास्पर्धेत कायद्याच्या चौकटीत कोण तरले आणि कोण बुडाले, हे सांगणारा आहे.**

## कोण तरले आणि कोण बुडाले

सत्ताधाऱ्यांनी किंवा विरोधकांनीही या निकालाबद्दल फार वर तोंड करून बोलू नये. सन १९७८मध्ये ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी प्रथम आपल्याच पक्षात बंडखोरी कशी करतात आणि सत्ता संपादन करतात, याचा वस्तुपाठ घालून दिला असला, तरी ते प्रकरण असे न्यायालयीन वेशीवर टांगले गेले नव्हते. याचे प्रमुख कारण, तेव्हा पक्षांतरबंदी कायदाच नव्हता. अभूतपूर्व बहुमत मिळाल्यानंतर (काहीशा धास्तीने) राजीव गांधी यांनी तो आणला. या बेंगरूळ आणि भारतीय लोकशाहीच्या चौकटीशी विसंगत अशा कायद्याने आजवर असंख्य न्यायालयीन तंटे निर्माण झाले. सर्वोच्च न्यायालयात 'ठाकरे गट विरुद्ध शिंदे गट विरुद्ध महाराष्ट्राचे राज्यपाल' असा तिहेरी संघर्ष उभा राहण्यामागे अनेक वाटा-पळवाटा राहिलेला हा कायदाच आहे. घटनापीठाने राज्यपालांसहित अनेकांच्या वर्तनावर कोरडे ओढून, शेवटी या सरकारचे प्राण मात्र वाचविले आहेत. एका अर्थाने, लोकशाहीत होणाऱ्या राजकीय धुमश्चक्रीत न्यायालयीन हस्तक्षेपाच्या मर्यादा या निकालाने अधोरेखित केल्या आहेत. त्या दृष्टीने हा निकाल उचित आहे. तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी स्वत:हूनच आणि सभागृहातील बहुमत चाचणीला सामोरे न जाता राजीनामा का दिला, हा घटनापीठाने उपस्थित केलेला प्रश्न मोलाचा आहे. आता उद्धव ठाकरे या निर्णयाला नैतिकतेचे सोन्याचे पाणी चढवत असले, तरी त्याला काही अर्थ नाही. न्यायासनासमोर कृती महत्त्वाची असते; मनात जपून ठेवलेली भावना नव्हे.



महाविकास आघाडीला जन्मापासूनच राजीनामे भोवत आले आहेत. पहिला राजीनामा, नाना पटोले यांनी विधानसभा अध्यक्षपदाचा दिला. त्यांना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष व्हायचे असावे. ते या पदावर असते, तर शिंदे यांच्या बंडाचे प्रकरण सभागृहात वेगळ्या प्रकारे हाताळता आले असते. राज्यपालांनी नवे अध्यक्ष नेमण्यात फारसा उत्साह दाखविला नाही. दुसरा राजीनामा, उद्धव ठाकरे यांचा. त्यांनी निडरपणे सभागृहाला सामोरे जाऊन बंडखोरांची बाजू उलटवायला हवी होती. शरद पवार यांनी आत्मकथनात केलेली टीका अगदी योग्य आहे. तिचा संदर्भ त्यांनी गुरुवारी दिला. तिसरा राजीनामा, शरद पवार यांचाच; पण तो निदान पक्षांतर्गत तरी होता. इतकी 'नैतिकते'ने ग्रासलेली दुसरी आघाडी आजवर झाली नसेल. घटनापीठाच्या या निकालात सर्वोच्च न्यायालय, निवडणूक आयोग, राज्यपाल आणि विधानसभा अध्यक्ष यांचा अधिकारांच्या सीमारेषांचा जो विचार दिसतो आहे, त्याकडे गदारोळात दुर्लक्ष होऊ नये. यातली प्रत्येक घटनात्मक संस्था आहे.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# शिवसेना कोणाची याचा निर्णय आधी

## विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचे स्पष्टीकरण, प्रतोदपदाचाही लवकरच निवाडा

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिवसेना कोणाची आहे आणि प्रतोदपदी कोण राहील, याबाबत आधी निर्णय होईल आणि त्यानंतर अपात्रतेच्या याचिकांवर निर्णय होणार असल्याचे विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी सांगितले. भरत गोगावले यांची नियुक्ती सर्वोच्च न्यायालयाने कायमस्वरूपी रद्द केलेली नाही, असेही नार्वेकर यांनी नमूद केल्याने त्यांच्या फेरनियुक्तीचेही संकेत आहेत.**



त्यामुळे ठाकरे गटाला पुन्हा सर्वोच्च न्यायालयात दाद मागावी लागण्याची चिन्हे आहेत. नार्वेकर हे लंडन दौऱ्यावरून सोमवारी परतले असून सर्वोच्च न्यायालयाचा सत्तासंघर्षाबाबतचा निर्णय, आमदार अपात्रतेच्या याचिकांवरील सुनावणी, प्रतोदपदी शिंदे गटाचे भरत गोगावले राहणार की ठाकरे गटाचे सुनील प्रभू अशा विविध मुद्द्यांवर नार्वेकर यांनी भाष्य केले.

विधानसभा अध्यक्षांची निवड, शिंदे-फडणवीस सरकारवरील विश्वासदर्शक ठराव या कालावधीत शिवसेना कोणाच्या ताब्यात होती, शिंदे-ठाकरे गटाकडे किती लोकप्रतिनिधी, पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा पाठिंबा होता, शिवसेना पक्ष कोणाचा आदी मुद्द्यांवर मी आधी निर्णय घेणार असल्याचे सांगून नार्वेकर म्हणाले, शिवसेना संसदीय पक्षाने गोगावले यांची नियुक्ती केल्याने ती न्यायालयाने रद्द केली आहे. पण त्यांची पुन्हा पक्ष प्रतोदपदी नियुक्ती होऊ शकते. शिवसेना राजकीय पक्षाचे ते प्रतोद आहेत का, हे तपासण्यासाठी शिवसेना राजकीय पक्षाचे प्रमुख कोण, पक्षाची घटना काय सांगते, किती लोकप्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्यांचा पाठिंबा कोणत्या गटाकडे आहे, आदी बाबी या राज्यघटनेतील तरतुदी, आयोगाकडे राजकीय पक्ष म्हणून सादर केलेली कागदपत्रे आणि अन्य पुराव्यांच्या आधारे तपासल्या जातील. शिंदे-ठाकरे गटाला पुरावे सादर करण्यासाठी आणि बाजू मांडण्यासाठी वेळ दिला जाईल. त्यानंतर शिवसेना राजकीय पक्ष कोणाकडे आहे, यावर निर्णय देऊन प्रतोदपदाचाही निर्णय होईल.

केंद्रीय निवडणूक आयोगाने शिंदे गटाला शिवसेना म्हणून मान्यता दिल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे प्रमुख नेते आहेत. त्यांना प्रतोद नियुक्तीचा अधिकार असून आता राजकीय पक्षाची बैठक बोलावून गोगावले यांची फेरनियुक्तीची प्रक्रिया राबविण्याचे शिंदे गटाचे प्रयत्न आहेत. तसा निर्णय झाल्यास ठाकरे गटाला सर्वोच्च न्यायालयात पुन्हा धाव घ्यावी लागणार आहे.

### दबावाला घाबरणार नाही

१६ आमदारांच्या अपात्रतेच्या याचिकांवर आधी निर्णय घ्यावा, अशी मागणी ठाकरे गटाने केली आहे. याबाबत विचारता नार्वेकर म्हणाले, शिवसेना व प्रतोद कोणाचे, याचा निर्णय झाल्यावर प्रत्येक अपात्रतेच्या याचिकेवर सुनावणी सुरू होऊन ती पूर्ण होईल, त्यानुसार निर्णय दिला जाईल. त्यासाठी निश्चित किती कालावधी लागेल, हे सांगता येणार नाही. कोणत्याही दबावाला मी घाबरणार नाही. निवडणूक आयोग, सर्वोच्च न्यायालयातही काही महिन्यांचा कालावधी गेला. त्यामुळे अपात्रतेच्या याचिकांवर १५-२० दिवसांत निर्णयांची अपेक्षा करणे योग्य नाही. प्रत्येकाला बाजू मांडण्याची संधी द्यावी लागेल. राज्यघटना व लोकप्रतिनिधित्व कायद्यातील तरतुदी व नियमावली यानुसार योग्य निर्णय लवकरात लवकर दिला जाईल, असे नार्वेकर यांनी स्पष्ट केले.

### ठाकरे गटाचे निवेदन

**१६ आमदारांच्या अपात्रतेच्या याचिकांवर तातडीने १५ दिवसांत निर्णय घेण्याची मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटातर्फे करण्यात आली असून विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांना सोमवारी निवेदन देण्यात आले. अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर लंडनहून मुंबईत परतले असून त्यांनाही एक-दोन दिवसांत निवेदन दिले जाणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या प्रतीसह ७९ पानी निवेदन ठाकरे गटातर्फे झिरवळ यांना देण्यात आले. न्यायालयाच्या निर्देशांच्या चौकटीत राहून अध्यक्षांनी लवकरात लवकर निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आल्याने आमदार सुनील प्रभू यांनी सांगितले.**

---

# मुंबईत काँग्रेसची स्वबळाची तयारी!

## राज्यात पक्ष प्रथम क्रमांकावर राहण्याचा पटोले यांना विश्वास

। मुंबई।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कर्नाटक विधानसभा निवडणुकीतील काँग्रेसच्या विजयानंतर महाराष्ट्रातील काँग्रेसचे नेते व कार्यकर्त्यांचे मनोबल उंचावले आहे. आगामी लोकसभा व विधानसभा निवडणुका महाविकास आघाडीबरोबर किंवा स्वबळावर लढलो तरी राज्यात काँग्रेस हाच क्रमांक एकचा पक्ष असेल, असा दावा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी 'लोकसत्ता'शी बोलताना केला. पक्षाने केलेल्या सर्वेक्षणाच्या आधारे मुंबई महापालिका निवडणुकीतही काँग्रेसला मोठे यश मिळू शकते. त्यामुळे या निवडणुका स्वबळावर लढण्याची पक्षाची तयारी असल्याचे त्यांनी सांगितले.**



राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांची बैठक झाली. त्यात आगामी लोकसभा व विधानसभा निवडणुका एकत्रपणे लढण्याचा निर्णय घेण्यात आला. जागावाटपासाठी प्रत्येक पक्षाच्या तीन प्रतिनिधींची मिळून एक समिती स्थापन करण्याचे ठरले. आगामी निवडणुका व काँग्रेस पक्षाची रणनीती काय असेल, याबाबत २१ मेला उस्मानाबादमध्ये पक्षाच्या प्रमुख नेत्यांच्या बैठकीत व २३ मे रोजी मुंबईत होणाऱ्या प्रदेश कार्यकारिणीच्या बैठकीत चर्चा केली जाईल, अशी माहिती पटोले यांनी दिली.

### जागावाटप कळीचा मुद्दा

कोकण पट्ट्यात काँग्रेस कमकुवत आहे, परंतु या वेळी लोकसभेची एक तरी जागा निवडून आणू, तसेच विधानसभेच्या किमान सहा जागा जिंकू, असा दावा त्यांनी केला आहे. आघाडीत जागावाटप हा कळीचा व अडचणीचा मुद्दा ठरणार आहे, अशी कबुलीही त्यांनी दिली. मुंबई महापालिकेची निवडणूक स्वबळावर लढविण्याची काँग्रेस नेत्यांनी अनेकदा घोषणा केली होती. परंतु १ मे रोजी मुंबईत झालेल्या महाविकास आघाडीच्या संयुक्त जाहीर सभेत मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष भाई जगताप यांनी मुंबईत भाजपचा पराभव करण्यासाठी आघाडी करून एकत्र निवडणुका लढविण्याची तयारी असल्याचे जाहीर केले होते.

### महाडवर काँग्रेसचा दावा

शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी ६ मेला महाड येथे सभा घेऊन काँग्रेसमधून त्यांच्या पक्षात प्रवेश केलेल्या स्नेहल जगताप या त्यांच्या विधानसभेच्या संभाव्य उमेदवार असल्याचे संकेत दिले होते. मात्र काँग्रेसने त्याला विरोध केला आहे. सोमवारी रायगड जिल्ह्याचे प्रभारी चारुलता टोकस, श्रीरंग बरगे व राणी अग्रवाल यांनी नाना पटोले यांची भेट घेऊन महाडची जागा काँग्रेसकडेच रहावी, अशी मागणी केली. त्याला पटोले यांनीही मान्यता दिली.

# श्री. म्हसोबा देवस्थान मित्र मंडळ बरखास्तीची घोषणा

। ठाणे।
महाईन्यूज । प्रतिनिधी।



गेल्या अनेक वर्षांपूर्वी सामाजिक कार्य करण्यासाठी स्थापन करण्यात आलेले ओवळे गावातील श्री.म्हसोबा देवस्थान मित्र मंडळ हे अखेर बरखास्त करण्यात आले आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, काही कारणास्तव तसेच काही लोकांची इच्छा होती की हे मंडळ बंद करण्यात यावे. त्यामुळे हे मंडळ दि.15 मे 2023 पासून बंद करण्यात आल्याची माहिती मंडळाचे संस्थापक शिवभक्त-अजित शिंदे यांनी 'महाईन्यूज'ला दिली.

यावेळी अजित शिंदे म्हणाले की, आजपर्यंत मंडळाच्या माध्यमातून विविध सामाजिक कार्य, उपक्रम राबविण्यात आले आहेत. तसेच आज मंडळ जरी बंद केले असले, तरी मंडळाच्या माध्यमातून आतापर्यंत जे सामाजिक कार्य चालू होते. ते इथून पुढेही मी स्वतः सुरू ठेवण्याचा प्रयत्न करेन.

यावेळी शिंदे यांनी मंडळातील सर्व सदस्य, मान्यवर व पदाधिकारी यांचे आतापर्यंत साथ दिल्याबद्दल आभार मानले. यापुढे मंडळाच्या नावाचा, व कोणत्याही पदाचा उल्लेख मंडळातील कोणालाही करता येणार नसल्याचे त्यांनी जाहीर केले व कोणीही मंडळाच्या नावाचा गैरवापर करू नये, असे आवाहनही शिंदे यांनी केले आहे.

# ‘सेबी’ची केंद्राच्या विरोधी भूमिका!

## अदानी-हिंडेनबर्ग प्रकरणाला नवे वळण, 2016 पासून अदानी समुहाची चौकशी नाही

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अदानी-हिंडेनबर्ग प्रकरणाला नवे वळण लागले असून २०१६पासून आपण अदानी समूहाची चौकशी केलेली नाही, असे सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड अर्थात ‘सेबी’ने सोमवारी सर्वोच्च न्यायालयात सांगितले. याबाबत केले जाणारे दावे हे ‘वस्तुत: निराधार’ आहेत, असे सेबीने म्हटले आहे. अदानी समूहाच्या चौकशीसाठी सेबीने सहा महिन्यांची मुदतवाढ मागितली असून त्यासाठी नव्याने प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आले आहे. यावरून काँग्रेसने केंद्रावर टीका केली असतानाच केंद्रीय वित्त मंत्रालय**



अदानी-हिंडेनबर्ग प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकांवर सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर सुनावणी सुरू आहे. या प्रकरणी मंगळवारी सुनावणी होण्यापूर्वी ‘सेबी’ने पुरवणी प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. यात ‘गुंतवणूकदार, भांडवली बाजारांचे हित लक्षात घेता या प्रकरणात अकाली आणि चुकीचे निष्कर्ष न्यायाच्या विरोधात होतील. आधीच्या प्रतिज्ञापत्रात उल्लेख केलेल्या ५१ भारतीय कंपन्यांची चौकशी करण्यात आली होती. मात्र अदानी समूहाची भांडवली बाजारात नोंदणी असलेली कंपनी यामध्ये नव्हती. २०१६पासून अदानी समूहातील कंपन्यांची ‘सेबी’मार्फत चौकशी होत असल्याची माहिती पूर्णत: निराधार आहे,’ असे म्हटले आहे.

यावरून काँग्रेसने केंद्र सरकारला लक्ष्य केले आहे. केंद्रीय वित्त मंत्रालयाने लोकसभेत दिलेल्या एका लेखी उत्तराच्या आधारे काँग्रेस सरचिटणीस जयराम रमेश यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. “अदानी समूहाची सेबीमार्फत चौकशी झाल्याची माहिती केंद्रीय वित्त राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी १९ जुलै २०२१ रोजी लोकसभेमध्ये दिली होती. आता मात्र अदानी समूहावरील कोणत्याही गंभीर आरोपांची चौकशी झाली नसल्याचे सेबी सांगत आहे.

यातील वाईट काय आहे? संसदेची दिशाभूल करणे की बनावट कंपन्यांच्या माध्यमातून आणि भ्रष्टाचार करून लाखो रुपयांची फसवणूक होत असताना सेबी काढत असलेली झोप? की त्यापेक्षाही वाईट म्हणजे त्यांचे हात कुणीतरी बांधून ठेवले आहेत,” असे सवाल रमेश यांनी केले आहेत. त्यांनी संसदेत केंद्राने दिलेल्या लेखी उत्तराचे छायाचित्रही ट्विटरवर प्रसृत केले आहे. वित्त मंत्रालयाने मात्र हे आरोप फेटाळले आहेत. संसदेत दिलेल्या माहितीवर आपण ठाम असल्याचे मंत्रालयाने ट्विटद्वारे म्हटले आहे. ‘१९ जुलै २०२१च्या प्रश्न क्रमांक ७२वर दिलेले उत्तर हे सर्व संबंधित यंत्रणांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे देण्यात आले होते,’ असे मंत्रालयाने म्हटले आहे.

### सेबीच्या पुरवणी प्रतिज्ञापत्रात काय?

**» आधीच्या प्रतिज्ञापत्रात उल्लेख केलेल्या ५१ भारतीय कंपन्यांची चौकशी करण्यात आली होती. मात्र अदानी समूहाची भांडवली बाजारात नोंदणी असलेली कंपनी यामध्ये नव्हती. २०१६पासून अदानी समूहातील कंपन्यांची ‘सेबी’मार्फत चौकशी होत असल्याची माहिती पूर्णत: निराधार आहे, असे सेबीने सर्वोच्च न्यायालयात दिलेल्या पुरवणी प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे.**

### यातील वाईट काय आहे?

**“संसदेची दिशाभूल करणे की बनावट कंपन्यांच्या माध्यमातून आणि भ्रष्टाचार करून लाखो रुपयांची फसवणूक होत असताना सेबी काढत असलेली झोप? की त्यापेक्षाही वाईट म्हणजे त्यांचे हात कुणीतरी बांधून ठेवले आहेत?**

**– जयराम रमेश, काँग्रेस सरचिटणीस**

---

## आंदोलक कुस्तीगिरांचे परदेशातील ऑलिम्पिकपटूंना पाठिंब्याचे आवाहन

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष ब्रिजभूषण शरण सिंह यांच्याविरुद्धचे आपले आंदोलन आता जागतिक पातळीवर नेण्याचे प्रयत्न भारतीय कुस्तीगिरांनी सुरू केले असून, यासाठी त्यांनी अन्य देशांतील ऑलिम्पिकपटूंना पाठिंबा देण्याचे आवाहन केले आहे. “आम्ही हे आंदोलन आता जागतिक पातळीवर नेणार आहे. आम्ही पाठिंबा मिळवण्यासाठी आता अन्य देशांतील ऑलिम्पिकपटू आणि ऑलिम्पिक पदकविजेत्यांना आवाहन करणार आहोत,” असे विनेश फोगटने सांगितले.**



“कुस्ती महासंघाच्या अध्यक्षांवर कारवाई करण्यासाठी आम्ही २१ मेपर्यंतची मुदत दिली आहे. तोपर्यंत निर्णय न झाल्यास आम्ही आंदोलन अधिक व्यापक करू.

**– विनेश फोगट**

कुस्तीगिरांच्या आंदोलनाचा सोमवारी २३वा दिवस होता. “आमच्या आंदोलनात व्यत्यय आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. येथे काही लोकांना रेकॉर्डिंग करायला, आमची छायाचित्रे काढायला पाठवले जात आहे. त्यांना थांबायला सांगितल्यास ते पळून जातात. काही अनोळखी महिलांनी आमच्या तंबूत झोपण्याचाही प्रयत्न केला. आम्हाला अनोळखी असलेल्या महिलांना पाठवून आमचे आंदोलन उधळून लावण्याचा प्रयत्न होत आहे. आम्हाला त्रास दिला जात आहे. सत्य आणि न्यायासाठी सुरू असलेल्या आमच्या लढ्याला कलंकित करण्याचा प्रयत्न सुरू आहे,” असेही विनेशने सांगितले.

“आम्हाला आता जंतरमंतरवर एका कोपऱ्यात ढकलले जात आहे असे वाटू लागले आहे. मात्र, आम्ही डगमगणार नाही.

## कर्नाटक मुख्यमंत्रीपदाचा निर्णय आज, पेच कायम : सिद्धरामय्या की शिवकुमार?

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कर्नाटकमध्ये काँग्रेसने दणदणीत विजय मिळवला असला तरी, सोमवारी मुख्यमंत्रीपदाचा पेच गंभीर बनल्याचे स्पष्ट झाले. नवनियुक्त आमदारांचे मत जाणून घेतल्यानंतर निरीक्षकांनी आपला अहवाल पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्याकडे सोपवला आहे. त्यावर खरगेंच्या घरी रात्री उशिरापर्यंत काथ्याकूट सुरू होता.**



काँग्रेसचे मुख्यमंत्रीपदाचे दावेदार सिद्धरामय्या यांचा तडजोडीचा प्रस्ताव डी. के. शिवकुमार यांनी फेटाळल्यानंतर, सिद्धरामय्या यांनी सोमवारी दिल्ली गाठली आणि खरगेंशी चर्चा केली. शिवकुमार यांचा वाढदिवस असल्याने त्यांनी राज्यातच राहणे पसंत केले होते. सिद्धरामय्या यांनी दिल्लीकडे धाव घेतली असली तरी शिवकुमार यांनी पक्षाध्यक्षांकडून बोलावणे येईपर्यंत दिल्लीला न जाण्याचा निर्णय घेतल्याचे सांगण्यात आले. आपण दिल्लीला जात नसल्याची माहिती सोमवारी रात्री शिवकुमार यांनी दिली. मी प्रदेशाध्यक्ष आहे. माझ्या कारकीर्दीत काँग्रेसने १३५ जागा जिंकल्या आहेत. मी एकटा लढलो आणि एकटी व्यक्ती बहुमत मिळवू शकते, असे विधान करून शिवकुमार यांनी मुख्यमंत्रीपदाचे आपणच दावेदार असल्याचे स्पष्ट केले. शिवकुमार आज, मंगळवारी दिल्लीत दाखल होण्याची शक्यता आहे. बेंगळूरुमध्ये १८ मे रोजी मुख्यमंत्र्यांचा शपथविधी होईल, असे सांगितले जाते. काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाने कर्नाटकमध्ये पाठवलेल्या तिन्ही निरीक्षकांनी रविवारी रात्री उशिरापर्यंत आमदारांशी स्वतंत्रपणे चर्चा करून त्यांची मते जाणून घेतली. प्रत्येक आमदाराला मुख्यमंत्रीपदासाठी पर्याय निवडण्याची सूचना केली गेली. आमदारांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर सुशीलकुमार शिंदे, दीपक बावरिया आणि संजय सिंह या निरीक्षकांनी सोमवारी संध्याकाळी खरगेंशी सविस्तर चर्चा केली. या वेळी प्रभारी रणदीप सुरजेवाला आणि संघटना महासचिव के. सी. वेणुगोपालही उपस्थित होते. मुख्यमंत्रीपदासाठी बहुसंख्य आमदारांनी सिद्धरामय्या यांना पसंती दिल्याचे सांगितले जाते.

# सायली संजीवच्या आयुष्यात पहिली पैठणी कशी आली? तिनंच सांगितला भन्नाट किस्सा..



लाखो तरुणांच्या मनाला भुरळ घालणारी अभिनेत्री सायली संजीव गेल्या काही दिवसांपासून बरीच चर्चेत आहे. तिचा 'हर हर महादेव' चित्रपट असो किंवा नुकताच आलेला 'गोष्ट एका पैठणीची' हा चित्रपट.. सध्या संपूर्ण वातावरण सायलीमय झाले आहे. बऱ्याच ठिकाणी ती प्रमोशनसाठी फिरताना दिसतेय. याच निमित्ताने ती 'झी' मराठी वरील 'होम मिनिस्टर' या कार्यक्रमात आली होती. यावेळी तिने तिच्या आयुष्यात पहिली पैठणी कशी मिळाली याचा भन्नाट किस्सा सांगितला.'होम मिनिस्टर'हा कार्यक्रम महाराष्ट्रातच नाही देशभरात लोकप्रिय आहे. या कार्यक्रमाचे आणि पैठणीचे एक वेगळे नाते आहे, या कार्यक्रमात घराघरातल्या गृहलक्ष्मीचा पैठणी देऊन सन्मान केला जातो. अशातच सायलीचा 'गोष्ट एका पैठणीची' हा चित्रपट रिलीज झाला आहे. ज्याची कथा पैठणी भोवती फिरते. याच निमित्ताने सायली 'होम मिनिस्टर' मध्ये आली होती. तेव्हा तिने पैठणीची खास आठवण सांगितली. सायली म्हणाले, 'मी आतापर्यंत एकही पैठणी विकत घेतलेली नाही. कोणतीही नाही. पण तुमचे खूप खूप आभार कारण मला पहिली पैठणी ही होम मिनिस्टरच्या कार्यक्रमात मिळाली होती. मी कधीच संगीत खुर्ची वैगरे कार्यक्रमात भाग घेतला नव्हता.

# 'इथं सिनेमात काम हवं तर...'; पाकिस्तानी अभिनेत्रीनं केली आपल्याच देशाची पोलखोल




सुंदर दिसणं म्हणजे केवळ रंग-रुप इथपर्यंतच ते सीमित नसतं,एका स्टारची ओळख ही त्याच्या टॅलेंटनं होते. पण कदाचित पाकिस्तानातील लोकांना याचा विसर पडला असावा. लॉलीवूड इंडस्ट्रीत आजही स्टार्सला त्यांच्या काळ्या-गोऱ्या रंगाकडे पाहून काम दिलं जातं. हे आम्ही नाही बोलत आहोत,तर पाकिस्तानची प्रसिद्ध अभिनेत्री सबूर अलीनं स्वतः आपल्या देशातील मनोरंजन सृष्टीची पोलखोल केली आहे.

पाकिस्तानी सिनेइंडस्ट्रीची प्रसिद्ध अभिनेत्री सबूर अलीनं एका टॉक शो मध्ये पाकिस्तानी सिनेइंडस्ट्रीची काळी बाजू लोकांसमोर आणली आहे. अभिनेत्रीनं सांगितलं आहे की सावळ्या रंगाच्या स्टार्सला स्क्रीनवर झळकण्याची संधी इथे फार दिली जात नाही. सबूरने या संदर्भात बोलताना सांगितलं आहे की- "मला वाटतं की हे सत्य आहे, पण जसा काळ पुढे सरकतो गोष्टी बदलतात. आता लोक या गोष्टी विरोधात आवाज उठवू लागले आहेत,पण असं घडतं पाकिस्तानच्या सिनेइंडस्ट्रीत हे देखील सत्य आहे".

अभिनेत्री पुढे म्हणाली की- "आम्हालाही मेकअप करून गोरं दिसायला सांगितलं जातं. आम्हाला मेकअप करणाऱ्यांना आदेश दिले जातात की मेकअपचा बेस गोरा असायला हवा,अभिनेत्री गोरी दिसायला पाहिजे. कितीतरी वेळा असं होतं की जर प्रीव्ह्यूमध्ये आमचा रंग थोडा डार्क दिसला तर पुन्हा गोरं करून शॉट घेतला जातो". पाकिस्तानी सिनेमाविषयी सबूर अलीनं खुलासा करत जे काही सांगितलं आहे त्याने सगळेच हैराण झाले आहेत. आणि अर्थातच यामुळे सबंध पाकिस्तानातील लोकांच्या विचार करण्याच्या पद्धतीवर प्रश्न निर्माण केला आहे.

# ब्रेकअप झालंय ? आठवण येतेय... उर्मिला कोठारेची पोस्ट चर्चेत



मराठी सृष्टीतील एक दिलखुलास सेलिब्रिटी कपल म्हणून आदिनाथ कोठारे आणि उर्मिला कोठारे यांच्याकडे पाहिलं जातं. काही दिवसांपूर्वी दोघांमध्ये दुरावा असल्याची चर्चा रंगली आहे. अशातच आता उर्मिलाने नुकतीचं शेअर केलेली पोस्ट चर्चेत आली आहे. त्यामुळे दोघांच्यातील दुराव्याची पुन्हा एकादा चर्चा रंगली आहे. उर्मिलानं नुकतीच शेअर केलेली एक पोस्ट सध्या चर्चेत आली आहे. उर्मिलानं तिच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की, ब्रेकअप झालंय ? अबोला धरलाय ? आठवण येतेय खूप ? त्रास होतोय ना..! कानात हेडफोन्स घाला आणि फक्त फिल करा...' असं उर्मिलाने पोस्टमध्ये म्हटलं आहे.

# सुशांत सिंगची गर्लफ्रेंड रियानं शोधला



बॉलीवूडचा दिवंगत अभिनेता सुशांत सिंग याचं जाणं हे अजुनही त्याच्या चाहत्यांसाठी धक्कादायक आहे. त्याचे चाहते हे नेहमीच त्याच्या आणि त्याच्या कुटूंबियाप्रती सहानुभूती व्यक्त करताना दिसतात. वेगवेगळ्या कारणासाठी सुशांत हा सोशल मीडियावर ट्रेंड होताना दिसतो. आता त्याची गर्लफ्रेंड रिया चक्रवर्तीनं लक्ष वेधून घेतलं आहे. सुशांतचा मृत्यु झाल्यानंतर विविध कारणांसाठी रिया देखील सोशल मीडियावर चर्चेत आली होती. तिच्यावर ड्रग्जचे सेवन केल्याचा आरोपही करण्यात आला होता. त्यासाठी तिला एनसीबीनं चौकशीसाठी बोलावले होते. याशिवाय ईडीच्या फेऱ्यातही ती अडकल्याचे दिसून आले होते. आता ती एका वेगळयाच कारणासाठी चाहत्यांच्या चर्चेचा विषय झाली आहे. तो विषय म्हणजे तिचा बिझनेसमन बॉयफ्रेंड.

गेल्या काही दिवसांपासून रिया ही एका उद्योगपतीला डेट करत असल्याच्या बातम्या व्हायरल झाल्या आहेत. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार तिला त्या बिझनेसमनशी लग्न करायचे आहे. त्यामुळे ती त्याला डेट करते आहे. त्या उद्योगपतीचे नाव बंटी सजदेह असे आहे. बंटी हा रियलिटी स्टार आणि फॅशन डिझायनर सीमा सजदेहचा भाऊ आहे. त्या गेल्या काही वर्षांपासून मनोरंजनविश्वात सक्रिय आहे. तो चालवत असलेल्या फर्मची सोशल मीडियावर चर्चाही आहे. गेल्या काही दिवसांपासून रिया आणि बंटीच्या अफेयरची चर्चा आहे. असं म्हटलं जातं की या वर्षाच्या सुरुवातीपासूनच ते एकमेकांना डेट करत आहेत. रियाच्या चाहत्यांनी देखील रियाच्या त्या नव्या नात्यावर आनंद व्यक्त केला आहे. तिला वेगवेगळ्या कमेंट करुन शुभेच्छा दिल्या आहेत. ७ ऑक्टोबरला बंटीचा जन्मदिवस होता. त्यावेळी रियाला बंटीच्या पार्टीमध्ये स्पॉट केले गेले होते. काही झालं तरी आपलं नातं हे काही कुणाला सांगायचं नाही असे त्यांनी ठरवले आहे.

# कतरिनापेक्षा चांगली मुलगी...

हिंदी सिनेमाविश्वातील प्रसिद्ध अभिनेता विकी कौशल आणि सारा अली खान यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या 'जरा हटके जरा बचके' सिनेमाचा आज ट्रेलर प्रदर्शित झाला. यावेळी एका कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. त्यात विकी आणि सारानं तिथं उपस्थित असलेल्या प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला. ट्रेलर लॉंच दरम्यानची. या कार्यक्रमात विकीला पत्रकारानं थेट त्याच्या व्यक्तिगत आयुष्याशी संबंधित प्रश्न विचारला. विकीला विचारण्यात आलं की, 'आपल्या देशात लग्न म्हणजे सात जन्माचं बंधन मानलं जातं.तुला हे योग्य वाटतं का?. कतरिना कैफपेक्षा चांगली व्यक्ती तुला आवडली तर घटस्फोट घेऊन दुसरं लग्न केलं तू करशील का?' हा प्रश्न ऐकल्यानंतर विकीसह सारा अली हिला देखील आश्चर्याचा धक्का बसला. आता विकी या प्रश्नाचं नेमकं काय उत्तर देतो याकडे सर्वांचं लक्ष लागलं होतं.



# धावांचा पाऊस पाडला!

## गेलेल्या मॅच जिंकवल्या, मॅच फिनिशर खेळाडूला निवड समिती गुड न्यूज देणार?

। मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

इंडियन प्रीमियर लीग अर्थात आयपीएलचा पंधरावा सीजन आता रोमांचक स्थितीत आला आहे. या स्पर्धेतील आतापर्यंत ६१ सामने पार पडले असून अजूनही कोणतीच टीम क्वालिफाय करू शकली नाही. आयपीएल स्पर्धेत जबरदस्त कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना थेट भारतीय क्रिकेट संघाकडून खेळण्याची सुवर्णसंधी मिळते. अशातच केकेआर संघासाठी मॅच फिनिशरची कामगिरी बजावणारा तडाखेबंद फलंदाज रिंकू सिंग याने भारतीय क्रिकेट संघातील आपली दावेदारी मजबूत केल्याचे बोलले जात आहे. सध्या जोरदार फॉर्मात असलेला रिंकू भारतीय क्रिकेटसाठी देखील फिनिशरची भूमिका उत्तम प्रकारे पार पडू शकतो.

डावखुरा फलंदाज असलेल्या रिंकू सिंग याला आक्रमक फलंदाजीसोबतच परिस्थितीप्रमाणे खेळ करणारा फलंदाज म्हणून ओळखले जाते. १४ मी रोजी झालेल्या चेन्नई सुपर किंग्स विरुद्धच्या सामन्यात रिंकूने जलदगती गोलंदाज आणि फिरकीपटू अशा दोन्ही प्रकारच्या गोलंदाजी विरुद्ध आपण प्रभावीपणे खेळू शकतो हे दाखवून दिले. त्यामुळेच निवडकर्त्यांना रिंकूला भारतीय क्रिकेट संघात लवकर निवड करावी लागणार आहे.



धावांचा पाठलाग करताना आतापर्यंत रिंकू सिंग याने ६ डावात २३८ रन्स केल्या आहेत. यात ३ अर्धशतकांचा समावेश असून १६७ च्या स्ट्राईक रेट ने त्याने या धावा केल्या आहेत. त्यामुळेच रिंकूला चेज मास्टर म्हणून ओळखले जात आहे. या सत्रात रिंकू सिंगच्या बॅटमधून धावांचा अक्षरशः पाऊस पडतोय. या सत्रातील तीनही अर्धशतक त्याने दुसऱ्या डावात फलंदाजी करताना केली आहेत. याचदरम्यान, २१ चेंडूत नाबाद ४८ तर दुसऱ्या डावात १० चेंडूत २१ धावांची महत्वपूर्ण खेळी त्याने आपल्या संघासाठी साकारली. यश दयालला एका षटकात ५ षटकार ठोकून केकेआरच्या विजयाचा हिरो झालेल्या रिंकू सिंगने हा फक्त योगायोग नाही तर, आपल्यात खेळ पालटण्याची ताकद आहे हे दाखवून दिले.

### रिंकूची दावेदारी मजबूत ?

» रिंकू ज्या स्थानावर फलंदाजीला येतो ते पाहता १३ सामन्यांमध्ये ४०० पेक्षा जास्त धावा करणे हे नक्कीच सोपे नाही. या २५ वर्षीय खेळाडूची सरासरी ५० पेक्षा जास्त असून स्ट्राईक रेट देखील १४३ आहे. आयपीएलच्या या सत्रात आतापर्यंत तब्बल ५ वेळा नाबाद खेळी करणाऱ्या रिंकू सिंग कडे दुर्लक्ष करणे हे अन्यायकारक ठरेल.

### विश्वचषक स्पर्धेत महत्वाचा रोल निभावू शकतो

» या वर्षी होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेनंतर रोहित शर्मा, विराट कोहली आणि के. एल राहुल सारखे सिनियर खेळाडू कदाचित भारतीय टीमचा हिस्सा नसतील. त्यामुळे २०२४ साली होणाऱ्या टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी नव्याने तयार होणाऱ्या संघात रिंकू सिंग हा महत्वाचा रोल निभावू शकतो.

---

# क्रिकेटच्या नियमांत १ जूनपासून मोठे बदल

## » WTC Final मध्ये तीन नवीन गोष्टी पाहायला मिळणार

। दुबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

क्रिकेटच्या नियमांत आता १ जूनपासून मोठे बदल होणार आहेत. मैदानावरील पंचांकडून दिला जाणारा 'सॉफ्ट सिग्नल'चा नियम रद्द करण्याचा निर्णय आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) घेतला आहे. या नियमाबाबत अनेक तज्ज्ञांनी टीका केली होती. त्यावरून गोंधळही निर्माण होत होता. टीव्ही पंचांनाही निर्णय देताना अडचण येत होती. आयसीसीने आणखी दोन नवीन नियम केले आहेत.

एक जूनपासून बदल आणि नवीन नियम लागू होतील. भारत-ऑस्ट्रेलियादरम्यान सात जूनपासून जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेची अंतिम लढत सुरू होणार आहे. त्यातही या नियमांचा वापर केला जाईल.



### फ्री-हिटबाबत नवीन नियम

» फ्री-हिटच्या निर्णयाबाबत किंचीतसा बदल करण्यात आला आहे. जर फ्री-हिटदरम्यान चेंडू स्टम्पला लागला आणि फलंदाजाने धाव घेतली, तर ही धाव धावफलकात जोडली जाईल. म्हणजे फ्री-हिटदरम्यान चेंडू स्टम्पला लागून फलंदाज त्रिफळाबाद झाला, तरी धाव घेऊ शकतो. मुंबईत सामना जिंकला आणि बंगळुरुत फटाके फुटले; स्वतःसाठी जमलं नाही ते आरसीबीसाठी केलं.

**हेल्मेट सक्तीचे**

आणखी एक नियम करण्यात आला आहे. तो म्हणजे, धोकादायक ठिकाणी क्षेत्ररक्षण करताना खेळाडूने हेल्मेटचा वापर करणे सक्तीचे असणार आहे. जेव्हा फलंदाज वेगवान गोलंदाजाचा सामना करीत असतो आणि यष्टिरक्षक यष्टयांच्या जवळ उभा असतो, तेव्हा यष्टिरक्षकाने हेल्मेट घालणे सक्तीचे असणार आहे. त्याचबरोबर आक्रमक क्षेत्ररक्षक लावताना फलंदाजांभोवती क्षेत्ररक्षकांचे कडे केले जाते. फलंदाजांच्या जवळ क्षेत्ररक्षणासह उभ्या असलेल्या खेळाडूस हेल्मेट सक्ती असणार आहे. गांगुली म्हणाले, 'खेळाडूंची सुरक्षा आमच्यासाठी महत्त्वाची आहे. त्यामुळे हेल्मेट सक्तीचा निर्णय आम्ही घेतला आहे.'

सॉफ्ट सिग्नलच्या निर्णयाबाबत इंग्लंडचा कसोटी कर्णधार बेन स्टोक्स आणि भारताचा माजी कर्णधार विराट कोहलीने शंका उपस्थित केली होती. जानेवारीत ऑस्ट्रेलिया-दक्षिण आफ्रिकेत झालेल्या कसोटी दरम्यान मार्नस लबुशेनसा झेलबाद देण्यावरून असाच मोठा गोंधळ निर्माण झाला होता. २०२१मध्ये इंग्लंडविरुद्धच्या टी-२० दरम्यानच्या लढतीत भारतीय संघाला या निर्णयाचा फटका बसला होता. तेव्हा कोहलीने थेट टीका केली होती. आयसीसी क्रिकेट समितीत गांगुली यांच्यासह माहेला जयवर्धने, रॉज हार्पर, डॅनिएल व्हिटोरी, व्ही.व्ही. एस. लक्ष्मण, जय शहा हे आहेत.

# मुंबई इंडियन्सची २२ वर्षांच्या खेळाडूला कडक शिक्षा!

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

मुंबई इंडियन्सच्या संघात नेमकं चाललंय, याची जोरदार चर्चा क्रिकेट विश्वात सुरु झाली आहे. कारण मुंबई इंडियन्सच्या संघाने आपल्या खेळाडूलाच शिक्षा केली आहे. मुंबई इंडियन्सच्या संघाने या २२ वर्षांच्या खेळाडूला अशी शिक्षा दिली की त्याला नजरही मिळवता येत नव्हती. या गोष्टीचा व्हिडिओ हा सध्याच्या घडीला चांगलाच व्हायरल झाला आहे.



मुंबई इंडियन्सचा नेहल वधेरा हा सर्वांनाच परीचयाचा आहे. मुंबईच्या विजयात २२ वर्षांच्या वधेराने बऱ्याच वेळा मोलाचा वाटा उचलला आहे. पण वधेरासारख्या खेळाडूलाही मुंबई इंडियन्सने सोडलेले नाही. कारण मुंबई इंडियन्सच्या संघात कडक शिस्त पाळली जाते. त्यामुळे वधेरासारख्या खेळाडूलाही मुंबई इंडियन्सने शिक्षा केल्याचे पाहायला मिळाले.

प्रत्येक संघाचे काही नियम असतात. मुंबई इंडियन्सच्या संघाची एक खास बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीसाठी सर्व खेळाडूंना बोलावण्यात आले होते. ही एक महत्वाची बैठक होती. पण या बैठकीला वधेरा उशिरा पोहोचला. त्यामुळे वधेराला एक शिक्षा यावेळी देण्यात आली. ही शिक्षा ऐकाल तर तुम्हीदेखील हैराण व्हाल. कारण यावेळी वधेराना विमानतळावर पॅड घालून चालण्याची शिक्षा देण्यात आली. पॅड घालून विमानतळावर आतापर्यंत तरी कोणाला चालताना तुम्ही पाहिले नसेल, त्यामुळे जेव्हा वधेरा हा विमानतळावर पॅड घालून चालत होता तेव्हा लोकं त्याच्याकडे पाहून हसत होते.